# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. :- ०२०-२५६०११८९/११९०
फॅक्स नं.: - ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ:- www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे-४११००७

संदर्भ क्रमांकः- आरक्षण/ओ-२२/४८९ दिनांकः-११/०५/२०१३

प्रति,
मा.प्राचार्य / मा.संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

विषयः- रिट याचिका क्र. ३२९४/२०१० व इतर जनहित याचिका- निलिमा अनंत सुर्वे विरूध्द महाराष्ट्र शासन. मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २२/०२/२०१३ रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

संदर्भः- शासन पत्र क्रमांक-अपंग-२०१३/प्र.क्र.१-२०१३/आस्था-२, दिनांक- २५/०३/२०१३.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ०४/०३/२०१३ च्या पत्राची प्रत व दिनांक २२/०२/२०१३ रोजी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे. इतिवृत्तामध्ये नमूद केलेले निर्देश स्वयंस्पष्ट असून त्यानुसार पूर्ततेबाबतची आवश्यक कार्यवाही त्वरित करण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबतचा पूर्तता अहवाल वेळोवेळी शासनास सादर करण्यात यावा व अहवालाची एक प्रत या कार्यालयाकडे देखील सादर करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

११/५/१३

उपकुलसचिव
(आरक्षण कक्ष)

सोबतः- वरीलप्रमाणे

इतिवृत्त (बैठक दि. २२.२.१३)
अपंग अधिनियम अंमलबजावणी

UNIVERSITY OF (General) 09 APR 2013 Inward No. 421

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : अपंग-२०१३/प्र.क्र.१-२०१३/आस्था-२
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: २५.३.२०१३

मा. कुलसचिव कार्यालय पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक क्र.-आर/ 1372
दिनांक - 03/05/13
जावक दिनांक -
विभाग - 06/05/13
Reservation cell.

प्रति,

**सर्व सहसचिव / उपसचिव,**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

विषय : **रिट याचिका क्र. ३२९४/२०१० व इतर जनहित याचिका** - निलिमा अनंत सुर्वे विरुध्द महाराष्ट्र शासन
मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २२.२.२०१३ रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त

**महोदय,**

%

सोबत, उपरोक्त विषयासंदर्भातील सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक ४.३.२०१३ च्या पत्राची प्रत व दिनांक २२.२.२०१३ रोजी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत जोडली आहे.

इतिवृत्तात नमूद केलेले निर्देश स्वयंस्पष्ट असून, ते आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधितांच्या (शासकीय तसेच अनुदानित अशासकीय संस्थासह) निदर्शनास आणण्यात येऊन, पूर्ततेबाबत आवश्यक कार्यवाही त्वरित करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(बा. म. राऊत)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

*प्रत त्वरित कार्यवाहीस्तव :*

- **संचालक (उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / व्यवसायशिक्षण व प्रशिक्षण / कला / ग्रंथालय), महाराष्ट्र राज्य,**
- **सर्व कुलसचिव (अकृषिक विद्यापीठे), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.**

उ. कु. (आरक्षण)
3.5.2013

आरक्षण कक्ष
पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७
दिनांक - 7/5/2013 आवक क्र.- 678
विभाग -

9

महाराष्ट्र शासन

न्यायालयीन प्रकरण /कालमर्यादा

क्रमांक :-न्यायाप्र -२०११/प्र.क्र.९१(भाग-२) /अ.क.२
सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -३२
दिनांक :- ०४ मार्च, २०१३.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
कार्यासन आस्था-2 1625
दिनांक 21/3/2013 25/3/2013

प्रति,

सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव ,
मंत्रालयीन विभाग ,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय:- रिट याचिका क्र. ३२९४/२०१० व इतर जनहित याचिका
निलिमा अनंत सुर्वे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर
मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि. २२/२/२०१३
रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

महोदय /महोदया,

विषयांकित प्रकरणी मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि.२२ फेब्रुवारी, २०१३ रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

(स्वाक्षरी)

( सं. द. माने )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

सोबतः- वरीलप्रमाणे.

प्रतः- १) उप सचिव, मुख्य सचिव यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२,
२) सचिव (सा.न्या.) यांचे स्वीय सहाय्यक,

सा.न्या.व वि.स.विभाग/अ.क.२

विषय:-रिट याचिका क्र.३२९४/२०१० बाबत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या दि.२/११/२०१२ च्या आदेशानुसार दि.२२ फेब्रुवारी, २०१३ रोजी दु.४.०० वा.मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त

बैठकीस उपस्थितांची यादी सोबत जोडली आहे.

| अ.क्र. | बैठकीत घेतलेले निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा/ अधिकारी | अंमल-बजावणी पूर्ण करण्याची तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | अपंगांना पुरविण्यात येणाऱ्या सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे यातील **Scooter with adaption** या उपकरणाबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दि.८/२/२०१३ रोजी शासन निर्णय पारीत केलेला आहे त्यानुसार सदर उपकरण मागणी केलेल्या कर्मचाऱ्यांना तात्काळ पुरविण्याची कार्यवाही सर्व विभागांनी करावी. तसेच या व्यतिरिक्त असलेली १६८१ इतर उपकरणे देण्याबाबतची कार्यवाही संबंधित विभागांनी अदयाप केलेली दिसत नाही.' तरी याबाबत संबंधित विभागांनी कोणत्याही परिस्थितीत मागणीधारक कर्मचाऱ्यांना उपकरणे पुरविण्याबाबतची कार्यवाही दि.३१ मार्च, २०१३ पर्यंत पूर्ण करावी.<br>ज्या कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे यांची आवश्यकता नाही अशा कर्मचाऱ्यांकडून लेखी जवाब विभागाने /कार्यालयाने घ्यावा तसेच सदर जवाबाची एक प्रत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास पाठविण्यात यावी. | मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग | दि.३१ मार्च, २०१३ | |
| २ | शासकीय /निमशासकीय सेवेतील अपंग अनुशेष कोणत्याही परिस्थितीत माहे डिसेंबर, २०१३ पर्यंत पूर्णपणे भरुन काढण्याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या आदेश दिलेले आहेत. त्यानुसार सर्व संबंधित विभागांनी अपंगांची | मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग | दोन महिने | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पदे विशेष भरती मोहिम राबवून भरण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. त्यानुषंगाने रिक्त पदे भरण्यासंदर्भात मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास दोन महिन्यामध्ये सादर करण्याची कार्यवाही करावी. | | | |
| ३ | शासकीय /निमशासकीय सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांची पदोन्नतीने भरावयाची रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्यात यावीत. त्याकरीता विभागीय पदोन्नती समितीच्या (DPC) बैठका पुढील दोन महिन्यात घेऊन कार्यवाही पूर्ण करावी. | मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग | दोन महिने | |
| ४ | अपंगांसाठी सुनिश्चित करावयाच्या पदांबाबतचे प्रस्ताव संबंधित विभागांना वारंवार कळवूनही सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीतील तज्ञ समितीपुढे वेळेवर सादर करण्यात येत नाहीत. याबाबत दक्षता घेऊन सदर प्रस्ताव तात्काळ सादर करावेत. | मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग | एक आठवडा | |
| ५ | शासकीय /निमशासकीय सेवेत सध्या कार्यरत असलेल्या अपंग कर्मचारी /अधिकारी यांची परिपूर्ण माहिती आयुक्त, अपंग कल्याण यांना सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी दि.३१ मार्च, २०१३ पर्यंत सादर करावी | मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग | दि.३१ मार्च, २०१३ | |

दि. ०१ नोव्हेंबर, २०१२ ते दि. २२ फेब्रुवारी, २०१३ या कालावधीत फक्त २९ कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे पुरविण्यात आल्याचे सकृतदर्शनी दिसून आले आहे. प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणी होत असलेली दिरंगाई अतिशय गंभीर बाब आहे. शासकीय /निमशासकीय सेवेतील मागणी नोंदविलेल्या विभागातील व विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील अपंग कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे कोणत्याही परिस्थितीत दि.३१ मार्च, २०१३ पर्यंत पुरविण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. तसेच त्याबाबतची माहिती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास विनाविलंब उपलब्ध करुन देण्यात यावी, असे निर्देश मा. मुख्य सचिवांनी दिले.

उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

**रिट याचिका क्र.३२९४/२०१० बाबत दि.२२ फेब्रुवारी, २०१३ रोजी दु.४.०० वा. मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीस उपस्थित असलेले अधिकारी**

| अ.क्र. | नांव व पदनाम | विभाग |
|---|---|---|
| १ | श्री.स्वधीन क्षत्रीय, अपर मुख्य सचिव | महसूल व वन विभाग (महसूल) |
| २ | श्री. एस. के. गोयल, अपर मुख्य सचिव | कृषी व पदुम विभाग |
| ३ | श्रीमती मेधा गाडगीळ, प्रधान सचिव | गृह विभाग |
| ४ | श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव | पा |
| ५ | श्री. वि.ल.आचलीया, प्रधान सचिव | विधी व न्याय विभाग |
| ६ | श्री. एस. के. शर्मा, प्रधान सचिव | परिवहन |
| ७ | डॉ. रमेशचंद्र सागर, प्रधान सचिव | आदिवासी विकास विभाग |
| ८ | श्री.संजय कुमार, प्रधान सचिव | उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| ९ | श्री. प्रविण परदेशी, प्रधान सचिव | महसूल व वन विभाग (वने) |
| ९ | श्री.एस. के. मुखर्जी, सचिव | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ७ | श्री. एस. के. संधू, सचिव | ग्रामविकास व जलसंधारण विभाग |
| ८ | श्री.आर. डी. शिंदे, सचिव | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| ९ | श्री. बाजीराव जाधव, आयुक्त | अपंग कल्याण पुणे |
| १० | श्री. भा. सु. तायडे, उप सचिव | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| ११ | श्री. ता. मा. कोळेकर, उप सचिव | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| १२ | श्री.बा. वि. निकम, उप सचिव | सामान्य प्रशासन विभाग |
| १३ | श्री.दि. सो. राजपूत, उप सचिव | उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग |
| १४ | श्री.पी. जी. मेस्त्री, उप सचिव | नियोजन विभाग |
| १५ | श्री. उ. द. वाळुंज, उप सचिव | अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग |
| १६ | श्री. शां. सि. कुदळे, उप सचिव | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग |
| १७ | श्री.ब. बा. चव्हाण, उप सचिव | महिला व बाल विकास विभाग |
| १८ | श्री. प्रकाश गोरावी, उप सचिव | कृषी व पदुम विभाग |
| १९ | श्री.सं. द. खेडेकर, अवर सचिव | वित्त विभाग |
| २० | श्री.श्री. र. यादव, अवर सचिव | नगर विकास विभाग |
| २१ | श्री. प्र. पां. लुबाळ, अवर सचिव | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| २२ | श्री. सं. द. माने, कक्ष अधिकारी | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| २५ | श्री.अविनाश धो. गांगुर्डे, कक्ष अधिकारी | गृह विभाग (परिवहन) |
| २६ | श्री.सुनिल सि. दिक्षीत, | राज्यपाल सचिव कार्यालय |
| २७ | श्रीमती हेमलता कोळी, वरिष्ठ लिपिक | पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई |
| २० | श्री.डी.एस. सूर्यवंशी, सहा.कामगार आयुक्त | कामगार आयुक्त कार्यालय |
| २१ | श्रीमती चित्रा पाटोदेकर, कक्ष अधिकारी | गृह विभाग |